


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासी कवितेतील समाजजीवन

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव,
ता. चाकूर जि.लातूर.

आदिवासी साहित्य हे मराठी साहित्याचा पाया आहे. आदिवासी म्हटले की, आपल्यासमोर जो पट उभा राहतो तो म्हणजे व्याकुळ करणारे लोकजीवन, संस्कृती, निसर्ग, धार्मिक संकल्पना आणि कलागुण यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती घट्ट पाय रोवून उभी आहे. जल, जंगल व इथल्या जमिनीचा मूळ मालक आदिवासी आहे. महात्मा फुले यांनी 'क्षेत्राधिपती' म्हणते आहे. ज्ञान- विज्ञान, शस्त्र- शास्त्रांचे जाणते आहेत. सत्याचे उपासक सरळ, साधे, स्वकृतत्वाचे धनी आहेत. सृष्टीच्या उत्पत्तीपासून निसर्गातील घडामोडी, उलथापालथी, डोंगर, दऱ्या, खोऱ्या, नद्या, नाले, पशु- पक्षी, कृषी- कीटक, जडीबुटी, वेली, वनस्पती यांचे साक्षीदार आणि जतन जोपासना केली आहे; परंतु त्यांना अतिप्राचीन काळापासून भारतीय अभिजात साहित्याचे पापी, अमंगळ, चोर, डाकू, रानटी, अडाणी, दरोडेखोर ठरवून बदनामीचा शिक्का त्यांच्या माथी मारला आहे. आज त्यांची आदिवासी म्हणून ओळख आहे; परंतु तो खऱ्या अर्थाने निसर्गाच्या अंगा- खांद्यावर लोळणारा दगड- धोंड्याच्या ठेचा खाऊन तळपायात हेकळी, बाभळीच्या काट्यावर चालणारा आणि पर्यावरण सन्मुख जीवन जगणारा आदम आहे. फळे, कंदमुळे खाऊन भूमीच्या आधाराने जगत होता. आज जागतिकीकरण, भांडवलीकरण, उदारीकरण, यांत्रिकीकरण, संगणकीकरण, युगातील खाऊजा धोरणातील कंपनी सरकारने त्यांची भूमी आबाळास करण्याचे धोरण आखून घशात घालण्याचा घाट चालवला आहे; परंतु आता त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे. ते आज शिक्षण घेऊन आपले साहित्य लिहीत आहेत त्याचाच परिणाम म्हणजे मराठी साहित्याची समृद्ध वाटचाल आहे. ती दलित, आदिवासी, ग्रामीण, ख्रिस्ती, जैन, मुस्लिम, स्त्रीवादी इत्यादी प्रवाहामुळे आहे. मराठी साहित्य आज सातासमुद्राच्या पलीकडे पोहोचले आहे. ते या साहित्य प्रकारामुळे आदिवासींच्या लोककथा, लोकगीते, जानपदगीते, देव-देवतांच्या, मनुष्य- प्राण्यांच्या उत्पत्ती, मरण्याच्या कथा, जनव्यवहाराचे वाद- संवाद, घात- प्रघात, बोलण्याचालण्याचे आडाखे ,म्हणी आणि वाक्प्रचार हा आदिवासी साहित्याचा पहिला हुंकार मानला जातो. या सर्व साहित्यप्रकारांचा कर्ता अज्ञात असला तरी आदिवासी मात्र अनादी काळापासून साहित्यावर जगला आणि आजही जगतो आहे. हे साहित्य मौखिक स्वरूपाचे होते. एका पिढीकडून पुढच्या

पिढीकडे केवळ मौखिक परंपरेने चालत येऊन जोपासला गेला आहे. हेच खरे साहित्य म्हणजे अक्षर, अखंड, अमर साहित्य होय.आदिवासी साहित्य म्हणजे काय? हे सांगताना डॉ विनायक तुमराम यांनी म्हटले आहे, "आदिवासी साहित्य हा काही ओळखपत्राने पटवून देण्यासारखा आज विषय राहिलेला नाही, तर मराठी साहित्याचे वैभवलेणे असा त्याचा उत्स्फूर्त गौरव आदिवासी साहित्य संमेलनामध्ये व इतरही अनेक मान्यवरांनी केला आहे. एवढेच काय परंतु मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह अशी मोहरही लावून टाकली आहे; परंतु आदिवासी साहित्य हे केवळ मराठी साहित्याचेच नव्हे, तर विश्व साहित्याचे वैभव लेणे आहे. ही माझी धारणा आहे आणि म्हणूनच हे साहित्य मराठी वाङ्मयातील केवळ एक प्रवाह हा समज मी आधी नाकारतो."( प्रा. तुकाराम बी रोंगटे, आदिवासी कवितेचा उषःकाल आणि सद्यस्थिती, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पृष्ठ क्र.७) डॉ. तुमराम यांचे हे मत अगदी सत्य आहे. आदिवासी साहित्याची इमारत मजबूत आहे. आदिवासी साहित्य हे उंटावर बसून शेळ्या हाकत नाही किंवा आकाशाला लाथा मारत नाही किंवा स्पंज व हवेच्या मखमली गादीवर बसून, एसी खाली बसून पजगळ गप्पा मारत नाही. तसेच कोणाच्या साहित्याची कलम करत नाही, तर ते संपूर्ण मानव विश्वात स्वयंभू, स्वतंत्र, स्वयंसिद्ध आणि चैतन्यमय, चिंतनात्मक नवनिर्मित साहित्य आहे. महत्त्वाचे असे की, आदिवासी साहित्य पृथ्वीवरील मूळ आदम समूहाचे व टोळ्यांचे लोकपरंपरा, लोकसंस्कृती मूल्यांनी बहरलेले साहित्य आहे. त्यामध्ये आदिवासी कविता म्हणजे आदिवासी साहित्याच्या शरीराला जो आत्मा आहे. त्याला चालवणारे ऑक्सिजन आहे. याबाबतीत डॉ विनायक. तुमराम म्हणतात, "आदिवासी कविता हे आदिवासी साहित्यसृष्टीचे नक्षीदार, कोरीव व भक्कम महाद्वार होय. आदिवासी साहित्याचे अस्तित्व, नोंदच मुळी कवितेने झाली आहे. ही कविता म्हणजे अस्तित्व आणि अस्मिता यांच्या रक्षणार्थ सुविद्य, सुजान व सजग आदिवासी मानसिकतेने उभारलेले शब्दांचे शस्त्रगार आज त्यासंबंधी काही प्राचीन पुरावे फारसे उपलब्ध नाहीत आणि जे आहेत तेही हवे तेवढ्या संख्येने नाहीत; पण त्यांचे उदासी वातावरण त्यात दूर दूर वसलेले गवती खोपट्यांचे लहान लहान वाड्या, पाडे, टोले त्यातील माणूस म्हणून जगणाऱ्यांचे संदर्भशून्य वहिवाट! आदिवासी कवितेची पायवाट येथून सुरू होते आणि शहरांमधील चळवळीच्या महामार्गाला येऊन मिळते. असा त्या कवितेचा प्रवास आहे. ( तुकाराम बी रॉगटे, उनी. पृष्ठ क्रमांक ११) या कवितांमधून आदिवासी माणसांच्या जाणिवा, संवेदना, निसर्ग, डोंगर, दऱ्या, भटकंती, शिकार, संकट, परंपरा, संस्कृती, नृत्य, सण, उत्सव, दारिद्र्य, दुःख, दैन्य, धैर्य, शौर्य, जंगल, कुपोषण, शिक्षण, अज्ञान, आरोग्य, मूलभूत गरजा, आचार- विचार, पोशाख इत्यादी घटकांचे चित्रण केले जाते. ती आदिवासी कविता होय. भुजंग मेश्राम, वाहारू सोनवणे, उषाकिरण आत्राम, विनायक तुमराम,

पुरुषोत्तम शेडमाके, वामन शेडमाके, माधव सरकुंडे, कुसुम आलम, रवी कुसंगे, सुनीता कोंडवार इत्यादी आदिवासी कवी कवयित्रींचे कवितासंग्रह प्रकाशित होऊन मराठी काव्य वाङ्मयाच्या इतिहासात मोलाची भर घालून मराठी कवितेचे दालन समृद्ध व भक्कम केले आहे. येथे विषयाला मर्यादा घालण्यासाठी फक्त भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, उषाकिरण आत्राम, बाबाराव मडावी, माधव सरकुंडे यांच्या काही कविता उदाहरणादाखल घेऊन आदिवासी समाजाचे दुःख दैन्य आदिवासी स्त्रियांच्या आयुष्यात झालेले परिवर्तन, आदिवासींच्या वाट्याला आलेले दारिद्र्य आणि कुपोषण अन्यायाचा प्रतिकार करण्याचे आदिवासीत असलेले सामर्थ्य आणि आदिवासी चळवळीचे महत्त्व, तसेच आत्मभान जागृत झालेल्या इतिहासाची पुनर्मांडणी करू इच्छिणारा आदिवासी नायक अशा आदिवासींच्या समूह जीवनातील अनेक सामाजिक व सांस्कृतिक पैलूंचे काव्यात्म चित्रण आदिवासी कवींनी कसे केले आहे. त्याचा शोध या शोधनिबंधात पुढील प्रमाणे घेण्याचे ठरवलेले आहे.

आदिवासींच्या जीवन जाणिवा व्यक्त करणारे प्रसिद्ध कवी भुजंग मेश्राम आहेत. 'गोंडी' ही त्यांची मातृभाषा होती. मातृभाषेबरोबरच लमानी, परधानी, व-हाडी आणि वारली आदी बोलीतून काव्य लेखन केले आहे. विनोद आणि उपहास, उपरोध यांचा वापर समाजातील विसंगतीबरोबरच स्वकीयातील दोषांची निर्भीडपणे मांडणी. जंगलामध्ये राहणाऱ्या माणसाबद्दल, त्यांच्या संस्कृतीबद्दल आत्मपिडेच्या भावनेतून लेखन. हे त्यांच्या कवितेचे सूत्र आहे. आदिवासींच्या दाहक जीवनाचे अनुभव त्यांनी आदिवासींच्या भाषेत व्यक्त केले आहेत. कवी हा आदिवासी कार्यकर्ता आहे. हजारो वर्षापासून सावकार, जमीनदार, भांडवलदार यांच्या दडपणाखाली आदिवासी समाज जगला आहे. कोंडवाड्यातील जाचक गुलामगिरीत आजही तो वावरत आहे. सतत त्याच्याच गळाला फासे उलटे पडत आहेत. आदिवासी स्त्रिया वरील बलात्काराच्या घटना रोजच समाज माध्यमातून येत असल्याचे दिसून येत आहे. आदिवासी समाजावर गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेला होता. या आदिवासींचे जीवन तरी जनावरासारखे घराभोवती काटेरी कुंपणात ठेवत. आत झाडंही बोरी बाभळीची, काटेरी, रोज पोलीस स्टेशनवर हजेरी द्यावी लागेल. गुन्हेगार असो वा नसो या भटक्या गुन्हेगारी जमातीत जन्म घेतला म्हणून ही शिक्षा सोबत शिकारी कुत्रे, गाढवे, दोनचार पाली, आज इथं तर उद्या तिथं. विंचवाच्या पाठीवर बिऱ्हाड. भटक्या विमुक्तांचा संसारच असा आज इथं उद्या तिथं आदिवासी जीवनातील हे काव्य मराठी दलित साहित्यातील एक नवे पर्व सुरू होत असल्याची साक्ष देते. साठोत्तरी मराठीच्या बदलत्या समाजजीवनातील आणि बदलत्या वाङ्मय प्रवाहातील विचारधारा आणि अभिव्यक्तीच्या नव्यानव्या वाटा. यातील आदिवासी कविता हा एक अनुबंध होय.

'सेटलमेंट' या कवितेची पार्श्वभूमी पाहता असे दिसते की, गुन्हेगार मुक्त जातीपासून इतरांना उपद्रव होऊ लागला म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळात पुनर्वसनाच्या नावाखाली त्यांची उघडे तुरुंग बांधले गेले. (एकूण ५२) मुख्य सोलापूर, अंबरनाथ, गुलबर्गा वगैरे अशा भटक्या- विमुक्तांना पोलीस स्टेशनवर रोज हजेरी द्यावी लागेल. अशा भीषण व भयान आयुष्य जगणाऱ्या आदिवासींचे 'सेटलमेंट' या कवितेतून साकार होते. 'सेटल झालास वाटतं' या प्रश्नाने कवीला सेटलमेंट आढळते. एकदा माणूस सेटल झाला की, तो आपल्या पोटापुरतं पाहतो. स्वतःपुरते जगतो. त्याला समाजाशी काही देणे घेणे उरत नाही. सुशिक्षित दलितांचे झपाट्याने होणारे मध्यमवर्गीयीकरण व स्वतःच्या समाजाशी त्याची तुटत चाललेली नाळ त्यांचे अत्यंत भेदक व सूचक चित्र कवी भुजंग मेश्राम 'सेटलमेंट' मध्ये चित्रीत करताना म्हणतात, "त्या दिवशी तो चर्चासत्राच्या गर्दीत भेटला, दोन चार आठवणी निघाल्या, चार दोन गमती, पोलीस स्टेशनवर रोजची हजेरी, रात्री झोपणारे शिकारी कुत्रे, गोण्यावरचा निवाडा... प्रत्येकवेळी तो अर्धवट बोलला, त्यातला अनुदानित कावळे हा शब्द तेवढा आवडला." ( संपा. कृष्णचंद्र ज्ञाते, आधुनिक मराठी पद्याचा पायाभूत अभ्यास, अभय प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती,१९९७, पृष्ठ क्रमांक १०२) आदिवासींसाठी कार्य करत असताना कवीला वेगवेगळ्या स्वरूपाच्या आदिवासींच्या जीवनाविषयीचे अनुभव आले कवी म्हणतो की, एका चर्चासत्राच्या गर्दीत एका सुशिक्षित दलित मित्राची व अशिक्षित दलित मित्राची भेट होते. त्या भेटीत जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. कारण दोघे एकत्र राहत असतात. आदिवासी असल्यामुळे गुन्हेगार जमातीत त्यांची गणना होत असल्यामुळे रोजच त्यांना पोलीस स्टेशनमध्ये हजेरी द्यावी लागत असे. मग गुन्हेगार असो वा नसो गुन्हेगार जमातीत जन्म घेतला म्हणून त्यांना जणू काही शिक्षाच इथल्या शासनकर्त्यांनी दिलेली असते. त्या आठवणींच्या चर्चा या दोन मित्रांच्या दरम्यान रंगतात. त्यानंतर शिकारी कुत्रे गोण्यावरचा निवाडा वगैरे गप्पा या अर्धवट होतात. त्यांच्या बोलण्यात सुशिक्षित दलितांच्या बाबतीत मात्र उदासीनता, उपहासच जाणवत होता. पिंडावर कावळे जसे पोचले जातात, तसेच ही सरकारी अनुदानावर पोसलेले सुशिक्षित बांधव असा त्याचा समज होता. अशी त्यांच्या जीवनाची परवड आहे. भीषण आणि भयान स्वरूपाचे आयुष्य त्यांच्या वाट्याला आलेले आहे. म्हणून कवीला दुःख वाटते की, आजचा सुशिक्षित दलित "संस्कृतीकरणातला सुसंस्कृतपणा तसा आरोपही त्यांचा, माझी कबुली" (उनि. पृष्ठ क्रमा क्रमांक, १०२) असा मध्यमवर्गीय संस्कृतीला म्हणून आज वावरू पाहतो आहे. त्याची त्याच्या समाजाशी असलेली नाळ तुटत चालली आहे. "कोनाडी बासनांसारखा विसराळूपणा मी त्याला शस्त्र म्हणू कसा? कशी काय आठवण झाली कुणास ठाऊक सेटलमेंट आठवल्यावर गोठल्या रक्तवाहिन्या आपसूक." (पृष्ठ क्रमांक,१०२) त्याला आपल्या सुशिक्षित मित्राचा थाटमाट

आवडलेला असतो. त्याचा सुसंस्कृतपणा पाहून त्याने आरोपही केलेला असतो. हे सुशिक्षित मित्राला मान्य असते. कारण समाजात तसेच घडत असते. सुशिक्षित दलित स्वतःला सुसंस्कृत समजून आपल्याच अज्ञानी व गरीब दलित बांधवांना दूर लोटित असतो. दलितातच सुशिक्षित दलित सवर्ण निर्माण झालेला असतो व स्वर्गाप्रमाणेच सुवर्णाप्रमाणेच जेव्हा तो आपल्या बांधवांना वागणूक देऊ लागतो. तेव्हा दलित मित्रांना खंत वाटणे साहजिकच असते. सरळपणे आपल्या बांधवांना विसरत गेलो. हे त्याला कसे सांगावे त्यावर तोच म्हणाला सेटल झालास वाटतं. हे ऐकताच सुशिक्षित तरुण मित्रास पूर्वीच्या सर्व आठवणी आठवल्या आणि त्या आठवणीने रक्तवाहिन्या गोठून गेल्या. सुशिक्षित दलित सारांश रूपाने त्याच्याशी बोलून आपली उदासीनता आणि त्याच्या विषयीचा उपहास त्याच्या बोलण्यातून जाणवत होता. सुशिक्षित मित्रालाही सत्य असत्याचे वाटत होते. कवी भुजंग मेश्राम यांनी सुशिक्षित झालेला दलित स्वतःला सवर्ण मानण्यात धन्यता वाटते. तू आपल्या बांधवाला विसरत चालला आहे याची खंत वाटते. सुशिक्षित दलित प्रस्थापित होऊन म्हणजेच तो सेटलमेंट होऊ पाहत आहे. मग समाजक्रांती, समाजपरिवर्तन असल्या गोष्टी सेटल झालेल्या कार्यकर्त्यांपासून दूर जात आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीत मिसळून जात आहे. स्वतःच्या समाजापासून दूर होऊन प्रस्थापित होत आहेत. मध्यमवर्ग क्रांतीला मारक असतो. आज दलितांची संख्या वाढली आहे. कर्मचारी वाढलेत, सुशिक्षित वाढलेत पण चळवळ थंडगार पडलीय, गोठलीय का तर सगळेच सेटल व्हायच्या मागे लागले आणि सेटल झालेल्या कर्मचाऱ्यांच्या भोवती उंची कंपाउंड येते, गेट येते. साखळीला बांधलेले कुत्रे येते आणि यामुळे सामान्य समाज त्याच्या घरी जायला भितो, दचकतो. खरे तर याचीच समाजापासून नाळ तुटत चाललेली आहे. तो वेगळा बनत चाललेला असतो. आत्मपरीक्षण किंवा आत्म टीका हा विशेष भुजंग मेश्राम यांच्या कवितेतून व्यक्त होतो.

कवी भुजंग मेश्राम आपल्या 'मोहोळ' या कवितेतून आदिवासी समाजाने अन्याय सहन करू नये, तर अन्यायाचा प्रतिकार करावा. आदिवासी समाजामध्ये लढण्याची ऊर्जा व उर्मी निर्माण झाल्याची जाणीव करून देतात. आदिवासी समाजाने संकटाला सामोरे जाऊन पेटून उठला, प्रतिकार करू लागला, तर त्याच्यावर अन्याय, अत्याचार करणारे घाबरून ढुंगणाला पाय लावून पळून जातील. एवढी क्षमता, सामर्थ्य आदिवासी समाजात आहे. त्यांच्यातील आत्मविश्वास जगवण्याची आवश्यकता आहे. बळाची प्रेरणा कवी देतात. कवी मेश्राम आपल्या कवितेतून म्हणतात, "रानाच्या गावाचं नाव विचारतात ते शस्त्रखोर योद्धे उभ्या पिकांमधून आले आपले दामटत रंगीत घोडे, शेताच्या आभाळात ढगांचा कापूस फुटल्यावरसुद्धा,

डोळ्यांच्या हातांना तू फिरू दिलं नाहीस कुठे" ( संपा, आधुनिक मराठी कवितेतील प्रवाह, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती,२०१३, पृष्ठ क्र.५७) आपल्या वरील अन्याय झुगारून देऊन अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सज्ज झालेल्या आदिवासींचे वर्णन कवीने केले आहे. कवी म्हणतात, रानाच्या काणशी या बनाच्या सळसळींचा गुंजारव ऐकताना आता हे रानशेत कळले आहे. "कापूस आतूनच पेटत असतो भरपूर, हे त्यांना माहीत असावे, म्हणून तर तुझ्या ओटीतला कापूस पाहून ते चुपचाप निघून गेले." उनी. पृष्ठ क्र.५७) भुजंग मेश्राम यांच्या कवितेतील आदिवासी स्त्री शक्तीचे विविध रूपं पाहायला मिळतात. म्हणून शस्त्र हातात घेऊन आलेले युद्धखोर सैनिक असूनसुद्धा तिचे पेलण्याचे सामर्थ्य पाहून गुपचूप निघून जातात. असे सामर्थ्य आदिवासी स्त्रियांमध्ये आहे. ज्याप्रमाणे डंख मारून अंगाची आग उठवण्याचे सामर्थ्य आग्या मोहोळाच्या माशीमध्ये असते, तसे या स्त्रियांचे असते. असे पांढराशुभ्र दिसणारा कापूस आतून पेटत असतो, तिच्या ओटीत कापूस होता आणि पदरामध्ये शेत शिवारातील मनोगतं कोरलेली आहेत. तिच्या शेताजवळ मोहोळ वृक्षाचे बन आहे. या रानवस्तीत सुसंगत असेच तिचे व्यक्तिमत्व आहे. मन पेटविण्याचे सामर्थ्य या स्त्रीमध्ये गर्भार रात्रीच्या अंतरंगात आदिम अंगार पेरलेला आहे. कवी म्हणून कवी म्हणतो कापूस म्हणजे मनी पेटविण्याची एक प्रतिमा आहे. पुढे कवी म्हणतात, "या रानाशी तुझे नाते सिद्ध झालेच आहे, तेव्हा एक कर या गर्भार रात्रीच्या अंगावरचा सुळका कापूस तेवढा वेचून काढ, म्हणजे तुला उमजेल काजव्यांचा आदिम मोहोळ, अन् उखासारखी भिनणारी माझ्या बोलीची ओळन् ओळ". उनि. पृष्ठ क्रमांक, ५८) आदिवासी स्त्रियांमध्ये असलेले सामर्थ्य आणि तिच्या बोली भाषेचे स्वरूप गारगोटीच्या ठिणगी सारखे आहे. म्हणजे ढगाळ रुईला गारगोटी एकावर एक आदळल्यावर पेटते. अन् रुई भुर्रर जळते. त्याप्रमाणे आदिवासींची संस्कृती, भाषा आज जळायला लागली आहे. कारण आदिवासी भाषेचे जतन करण्याऐवजी त्या भाषेला, संस्कृतीला, रानटी, गावंढळ ठरवीत आहे. म्हणूनच कवी मेश्रामच्या कवितेतील स्त्री प्रतिमा लढाऊ वृत्तीची होताना दिसते.

वारू सोनवणे हे आदिवासींचे जीवन त्यांच्याच बिलोरी बोलीत व्यक्त करणारे पहिले आदिवासी कवी होत. श्रमिक संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते, आदिवासी जीवनातील निसर्गसन्मुखता, माणसांच्या जीवनातील दैन्य, दारिद्र्य, अज्ञान यांचे चित्र हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य होय. 'गोधड' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. 'हिरवाळ जंगलात' या कवितेतून येणारे समाजजीवन हे आदिवासींचे जीवनचित्र आहे. सर्वसामान्य लोकांपासून हे आदिवासी कसे दूर आहेत. त्यांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या अवस्था कशी आहे. स्वातंत्र्य

मिळूनही या समाजाच्या दारी अद्यापही गुलामगिरीचे सूर्य कसे उगवतात. कष्टात त्यांचे जीवन कसे करपून जाते. आदिवासी जीवनाला व्यापून राहणारी भूक व गुलामीचा विनातक्रार स्वीकार करण्याचे बालपणापासून लाभलेले बाळकडू याचे चित्रण आले आहे. सुखाचा लवलेशही त्यांना प्राप्त होत नाही. अर्धपोटी अर्धवस्थांचे जीवन जगणारी, डोंगर कपारीत रानोमाळ हिंडणारी, मिळेल ते खाणारी, प्रसंगी कंदमुळे खाऊन जगणारी ही जमात आजही या जमातीच्या मुलांचे कुपोषणामुळे मृत्यू होत आहेत. आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना तयार होत आहेत; परंतु त्यामुळे प्रश्न सुटत आहेत का? हा खरा प्रश्न आहे. अजूनही प्रश्न तसेच कायम आहेत. त्यामुळे आदिवासींच्या जीवनात स्वातंत्र्याचा सूर्य उगवलाच नाही, असे जे म्हटले जाते ते आदिवासींचे जीवन पाहता वास्तव वाटते. "हिरवाळ जंगलात । गळून पडलेल्या, सागाच्या पानासारख्या । फाटक्या त्या झोपड्या । " (संपा. कृष्णचंद्र ज्ञाते, आधुनिक मराठी पद्याचा पायाभूत अभ्यास, अभय प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, १९९७ पृष्ठ क्रमांक, १०५) आदिवासी समाजाचे आणि जंगलात झाडाच्या पानासारखे लोकांपासून दूर आहे. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्ष झाली; परंतु त्याचा थोडाही फायदा त्या लोकांना झालेला नाही. त्यांच्या दरवाज्यात सतत गुलामगिरीचाच सूर्य उगवत राहिला. जंगलातच राहून, आजही कंदमुळे खाऊन ही माणसे आपले जीवन जगत आहेत. जीवन जगण्यासाठी रानोमाळ फिरत आहेत. कुपोषणामुळे त्यांचे मृत्यू होत आहेत. स्वातंत्र्याचा सूर्य उगवूनही त्यांच्या जीवनात मात्र अंधारच आहे; पण आता जंगलेच नष्ट होत असल्यामुळे आदिवासींच्या मुखातून ही कंदमुळेही हिसकावून घेतली गेली आहेत. जंगलातील त्यांची झोपडी दारिद्र्याची साक्ष देत उभे आहे. "कंद नाही मूळ नाहीत, ती केव्हा संपून गेलीत, अफाट भुकेच्या खपाट पोटात." उनि. पृष्ठ क्रमांक१०५) आता या जंगलात काहीच राहिले नाही. त्यांच्या जीवनाचा प्रश्न सुटेनासा झाला. कुपोषणाच्यामुळे मृत्यूची वेळ त्यांच्यावर आली. जंगलतोडीमुळे कंदमुळेही मिळेना. आदिवासी उपाशी राहू लागला उपासमारीने त्यांची पोटे खपाटी गेली. कुपोषणामुळे त्यांचे हाल झाले. वृत्तपत्रातून त्यांचे पडसाद उमटू लागली. सरकार कुपोषण थांबवावे म्हणून योजना आखू लागले; परंतु त्याचे फायदे त्यांच्यापर्यंत पोहोचेनात, त्यांचे कुपोषण थांबेना त्यांचा भुकेचा, जीवनाचा प्रश्न सुटलेला नाही. "हिरवाळ जंगलातील नागडी पोरं, आदिम साम्यवाद आणि गुलामगिरीचे खेळ खेळत होती, मातीत झोपडीसमोर." (उनि. पृष्ठ क्रमांक, १०५) जंगलातील देशाचे भावी आधारस्तंभ उघडी नागडी खेळ खेळत होती. साम्यवादाचे खेळ त्यांना लहानपणापासून खेळविले जात होते. लहानपणापासून त्यांना साम्यवादाच्या नावाखाली गुलामगिरीचेच घडे दिले जात होते. लहानपणापासूनच भूक आणि गुलामगिरीचे धडे या आदिवासी मुलांना मिळत असल्याचे भीषण वास्तव कवीने येथे चितारले आहे.

आदिवासी समाजाला संघटित करून चळवळीची उभारणी व आदिवासींच्या न्यायासाठी संघर्ष करण्याची तयारी करणारा वाहारू सोनवणे हा कवी आहे. जेव्हा जेव्हा माणसावर अन्याय, अत्याचार वर्षानुवर्ष होत जातो तेव्हा कोणताही माणूस अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी चळवळ उभी करतो. त्या चळवळीच्या माध्यमातून आपले प्रश्न शासन व्यवस्थेपर्यंत पोहोचवितो. आदिवासी लोकांचे जगणे असाहाय्य झाले तेव्हा त्यांनी चळवळ उभी केली; परंतु अलीकडे अनेक चळवळी निर्माण होतात. कालोघात त्या नष्ट होतात. कारण चळवळीमध्ये सच्चा कार्यकर्त्याचा निस्पृह, निस्वार्थी नेतृत्वाचा अभाव आहे. म्हणून चळवळी यशस्वी होत नाहीत. म्हणून कवी वाहरू सोनवणे आदिवासींच्या चळवळी संदर्भात लिहितात, "चळवळ म्हणजे काही दोन पाच दिवसाची जत्रा नव्हे की, नदीला आलेला पूर नव्हे, चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा, सतत विकसित होत जाणारा प्रवाह." (संपा. अजय टेंगसे, आधुनिक मराठी कवितेतील प्रवाह, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, २०१३, पृष्ठ क्रमांक, ५९) हजारो वर्षापासून जंगलात राहणाऱ्या माणसांना न्याय मिळत नाही. स्वातंत्र्याची साठ वर्षे झाली तरी विकासापासून हजारो मैल दूर असणारा हा समाजघटक कुपोषित, अर्धवस्त्र घालून जीवन जगत आहे. तोच या देशाचा मूलनिवासी आहे; परंतु हक्कदारालाच जंगलात पाठवून त्याचे अधिकारी इतरांनी घेतले म्हणून तो आजही गुलामीचे जीवन जगतो. म्हणून आता चळवळीशिवाय पर्याय नाही असे म्हणून आता चळवळीशिवाय पर्याय नाही असे कवीला वाटते म्हणून ते म्हणतात, "आता आमची चळवळ निर्माण केली आहे ती काही दोन पाच दिवसाच्या जत्रेसारखी नाही आज जत्रा भरली आणि पाच दिवसाला पाल उठले की, जत्रा संपली. अशी आमची चळवळ नाही. ही चळवळ माणुसकी शिकविणारी आहे. म्हणून या चळवळीवर कवीचा विश्वास आहे .त्यामुळे कवी हा एक चळवळीतील कार्यकर्ता आहे. महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा कार्यकर्ता आहे. म्हणून त्यांच्या विचारावर प्रचंड विश्वास आहे. कवी निराशावादी नाही. म्हणूनच या प्रतिकूल परिस्थितीतून तो मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतो. प्रवाह तो मातीच्या कणाकणातून पाझरतो. लहान मोठ्या झऱ्यांना जोडतो. सामावून घेतो. हा तो प्रवाह जो थांबत नाही. दगड टाकून अडवले अडत नाही." उनि. पृष्ठ क्रमांक,६०) एखाद्या नदीचा प्रवाह ज्याप्रमाणे अनेक झग्रांना जोडत जोडत समुद्राला जाऊन मिळतो. त्याप्रमाणे चळवळ एक एक माणसे जोडत ती व्यापक होत जाते. नदीला कोणी दगड टाकून तिला थांबू शकत नाही. तू अनेक वळणे घेत खडक चट्टाने फोडत ती वाट काढीत महासागराकडे गतिमान होत जाते. तसेच आता आमच्या आदिवासी माणसांच्या चळवळीचे आहे. आदिवासी माणूस अनेक अडीअडचणींना घाबरत नाही की, ते एक प्रसंगांना पार करून सामोरे जातो. कारण त्याला ध्यास असतो जेव्हा एखाद्या गोष्टीचा ध्यास असतो तेव्हा ती

गोष्ट पूर्ण होत असते. म्हणून चळवळ व्यापक असते .समाजपरिवर्तन हा चळवळीचा ध्यास असतो.

उषा किरण आत्राम यांनीही 'परिवर्तन' या कवितेत आत्मभान जागृत झालेली बंडखोर लढाऊ आदिवासी स्त्री-चित्रित केली आहे. स्वतःला विकसित, सुशिक्षित, सुसंस्कृत समजणाऱ्या ढोंगी समाजाला धडा शिकवण्याची क्षमता बाळगणारा आदिवासी समाज चित्रित केला आहे. आजची आदिवासी स्त्री जंगलातली सुखी सयना शिक्षणामुळे आता पुरोगामी विचाराने प्रेरित झालेली आहे. स्त्रियांची जागृती करण्यासाठी शोषण, अन्याय, अत्याचार, अन्यायाविरुद्ध आता बंड पुकारून क्रांती करण्यासाठी दलित, कष्टकरी, श्रमिक, शोषित अन्यायग्रस्त महिलांचे दुःख मांडण्यासाठी तयार होत आहेत. त्यांची जीवनमूल्य आणि जीवन प्रेरणा अधोरेखित केल्या आहेत. आदिवासींना कोणी आपल्या सोयीप्रमाणे गृहीत धरू नये त्यांनाही अस्मिता आहे. स्वाभिमान आहे .त्यांच्यात संरक्षणाची क्षमता आहे. या देशातल्या समाज व्यवस्थेतील रूढी प्रथा परंपरांना कर्मकांड यावर ती हल्ला करते म्हणून ती निडर झाली आहे राणी दुर्गावती, राणी हिराई, रावण, एकलव्य, बिरसा मुंडा, बाबुराव शेडमाके, तंट्या भिल्ल इत्यादींचा प्रेरक वारसा अधोरेखित केला आहे. म्हणून कवयित्री म्हणतात, परवा परवा पर्यंत आदिवासी स्त्री गोंडी पेहरावात म्हणजे लुगडे घालून वापरायची तेव्हा प्रस्थापित व्यवस्था तिला हसायची असे सारखे चालायचे. म्हणून उषा किरण आत्राम यांनी आदिवासी समाजातील वीर पुरुष आणि वीर स्त्रियांच्या गोष्टी सांगितल्या. त्यामुळे तिच्या मनावर परिणाम झाला. पुन्हा दुसऱ्या दिवशी अर्ध्या पेंडित कोयता धार लावून आणला होता. परवापर्यंत ती स्त्री गोंडी पेहरावत आपले दीड पेंडी लुगडे गोवायची आणि सारी फुसकी सदाशिव पेठ तिला पाहून फिदीफिदी दात काढायची. कवीने आदिवासी स्त्रीच्या आयुष्यात झालेले परिवर्तन चित्रीत केले आहे. आदिवासी स्त्री उघडी असल्यामुळे तिला दुधी भोपळे म्हणून शहरात चिडू लागले. त्या पहाटे तीने सागाच्या डालकीत सुपभर बिबे चेनून साया, काळकडे घेऊन आली. गाववाटेवर येताना सदाशिव पेठ कुरकुरली तिला पाडावरचा आंबा म्हटले तेव्हा तिने त्यांच्या नाका तोंडावर बिब्याचे तेल फेकले. त्यामुळे सैरभैर पळू लागले त्यांच्या नाकावर फोड आली. एके दिवशी अंगभर लुगडं गोवून शहरात येते. तेव्हा तिच्या हातात राणी दुर्गेचे चित्र होते. तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणी पेटत्या मशाली, धनुष्यबाण इत्यादी घेऊन शहरात एका मागोबाग निघतात. प्रस्थापित उच्चवर्णीयांच्या विरोधात गर्जना करत निघतात. त्या गर्जना अशा की, व्यवस्था बदलण्यासाठीच्या होत्या. त्या आशा "मक्तेदारी चालणार नाही, ब्राह्मण शाही चालणार नाही ! आम्ही नाही तर हिंदू !आम्ही आहोत कोयतुर! आमचा प्रकाश आम्हीच होऊ! पर प्रकाशी कधी न राहू! गोंडवाना जागवा

परकीयांना भगवा." .(उनी पृष्ठ क्रमांक,१४) ब्राह्मणशाही समाजव्यवस्थेची एकाधिकारशाही त्यांनी निर्माण केलेल्या जातीव्यवस्थेचा, दैववादाचा तीव्र विरोध करतात. एवढेच नाही, तर आम्ही हिंदूच नाही, तर आम्ही या देशाचे मूलनिवासी आहोत. म्हणून आमचा प्रकाश आम्हीच होऊ. तुम्ही आम्हाला प्रकाश दाखविण्याची गरज नाही. तुम्ही आमच्या देशातले नाही आहोत. म्हणून आमचा देश सोडून जा असे स्लोगन म्हणत गोंडवाना प्रदेशाला जागे करतात. म्हणून कवित्री म्हणतात, कालच्या मुक्या असणाऱ्या आदिवासी स्त्रिया आता परिवर्तनाच्या दिशेने चालू लागल्या आहेत. त्यांच्यामध्ये सुद्धा आता आत्मभान आलेलं आहे. 'स्व' ची ओळख झाली आहे. म्हणून त्या देखील परिवर्तनाच्या दिशेने निघालेल्या आहेत .म्हणूनच प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेला आदिवासी माणूस विरोध करताना दिसतो. हे मान्य करावेच लागते.

जंगल व दुर्गम भागात राहून काबाडकष्ट करणारी या भूमीचे भूमिपुत्र असलेल्या आदिवासींच्या वाट्याला आलेले दारिद्र्य आणि कुपोषण यांचे विदारक वास्तव कुपोषण कवितेतून आले आहे. आपल्या भारत देशामध्ये जंगल, कडे, पठाराने बसलेला जो समाज आहे. तो आजही जंगलात राहतो, कंदमुळे, फळे खाऊन जीवन जगताना दिसतात. ते नाही मिळाले, तर उपाशी झोपतो. विकासापासून सोयीसुविधापासून कोसो मैल दूर असणारा समाज म्हणून त्यांना ओळखले जाते. गहू, ज्वारी, अन्नधान्य मिळत नाही. म्हणून प्रसंगी उपाशी राहावे लागले. कपडे नसतील तर उघडे राहावे लागले. अशा समाजातला कवी बाबाराव मडावी शिकल्यामुळे आदिवासींच्या कुपोषणाबद्दल कवी व्यक्त करतात, "खोल डोळे गेलेल्या पोरानं माय बापाच्या चेहऱ्यावर अंधुक प्रकाशातून नजर टाकली, तेव्हा त्याचा बाप फाटक्या कपड्याने अश्रू पुसून मुळूमुळू रडत होता." उनि. पृष्ठ क्रमांक,५५) अशा शब्दात आदिवासींचे दाहक वास्तव रेखाटले आहे. कुपोषणग्रस्त मुलांच्या आई बापाची व्यथा वरील ओळीतून सुचित होते. त्या मुलाची आई उध्वस्त झाली होती. तिचं काळीज फाटलं होतं. हा मुलगा कुपोषणामुळे दगावला, तर आपल्या वंशाचा दिवा विझलेला आपल्याला डोळ्याने पहावे लागेल. या जाणीवेने ती घाबरली होती. पोरांच्या शरीराचा सनकाडीच्या काडी वाणी सापळा झाला होता. त्याचे तोंड चिमणीच्या तोंडावाणी झाले होते. त्याच्या तोंडात त्याची माय थेंब थेंब पाणी टाकीत होती. घरात खायला अन्न नसल्यामुळे पाणी पिऊन भूक भागवावी लागत होती. अश्रू समुद्र होऊन व्हायला लागले होते. घरात ज्वारीचा दाणा नाही तांदळाचा कण नाही. अशा अवस्थेत ती माय मुलाला मरणासन्न अवस्थेत पाहत आहे. डोंगराच्या माथ्यावर खडकाची शेती पिकविण्यासाठी जीवाचा आटापिटा करत ते दांपत्य जगत होते निसर्गाने दिलेले दान वानराच्या पोटात आणि पक्षांच्या घशात जात होते. त्यामुळे आदिवासी समाजातील मुलांचे कुपोषणाचे प्रमाण वाढले

होते "हा माळरान कसा पिकल, कसा खाईल चारा घास, जंगलची संपत्ती सरकारच्या दरबारात, भांडवलदारांच्या घरात, आदिवासी मृत्यूच्या दारात, पोरग कुपोषणाने घेरलं, कोळ्या जीवाले कोणी कसं मारलं," उनि. पृष्ठ क्र.५६) अशा सोप्या भाषेत कवीने आदिवासींची व्यथा चित्रीत केली आहे. आदिवासींचा वनसंपत्तीवर जन्मसिद्ध हक्क आहे; पण त्यापासून सरकारने, भांडवलदारांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवले. विकासाच्या योजनापासून वंचित ठेवले त्यामुळे आदिवासी लोकांच्या जीवनातील व्यथा कवीने चित्रित केली आहे.

अन्यायी, पीडित, शोषित, दुर्बल या आदिवासी समाजाच्या अवस्थेने तळमळणारी त्यांच्या उन्नतीसाठी, न्यायासाठी झटणारे माधव सरकुंडे हे श्रेष्ठ कवी आहेत. क्रियाशील सामाजिक कार्यकर्ते आदिवासींच्या प्रश्नांच्या मुळाशी जाणारे समस्या प्रधान काव्य लेखन करतात. कवी माधव सरकुंडे हे ज्या जगातून, समूहातून येतात त्या समाजाचे अनुभव घेतात. त्या अनुभवानेच त्यांच्या लेखणीला धार प्राप्त होते. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची चीड व्यक्त करतात. 'इतिहास' या कवितेतून आत्मभान जागृत झालेल्या इतिहासाची पुनर्मांडणी करू इच्छिणाऱ्या आदिवासी नायकाचे चित्रण केले आहे. अन्यायाची चीड, राग समाजव्यवस्थेविरुद्धचा असो अथवा राज्यव्यवस्थेविरुद्धचा असो कवी व्यक्त करतात. आदिवासींच्या शौर्याची नोंदच इतिहासाने आत्तापर्यंत घेतली नसल्याचा जाब कवीने व्यवस्थेसमोर विचारला असून आता आपला इतिहास आपणच मांडण्याची इच्छा 'इतिहास' या कवितेतून व्यक्त होते. आदीम काळापासून ते अलीकडच्या काळापर्यंत मानवी जीवन प्रवासाची जी सोयीने मोडतोड केली गेली. उदातीकरण आणि विकृतीकरण केले गेले ते वास्तव मांडले आहे. ज्यांच्या हातात लेखणी होती त्यांनी आपल्या सोयीचा इतिहास लिहिला. अनेकांना राक्षस, दैत्य, असूर, खलनायक म्हणून रेखाटले आणि हिनवले गेले. आदीम काळापासून दलित आदिवासींचे कार्य, कर्तुत्व प्रस्थापितांनी दडपून टाकले होते. आदिवासी समाजातील कर्तुत्वसंपन्न नायकाविरुद्ध जाणीवपूर्वक षडयंत्र रचून त्यांचा वास्तव इतिहास बदलून टाकण्यात आला. एकलव्य, शंबूक, तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा या कर्तृत्ववान आदिवासींचे अस्तित्व संपवण्यासाठी अनेक कपटकारस्थाने करण्यात आली. त्यांच्यावरील अन्यायाचा, छळाचा इतिहास कोणीच लिहिला नाही. ही खंत 'इतिहास' या कवितेतील नायक व्यक्त करतो. "एकदा गुरुजीने मला प्रश्न केला, कुणी दिला तुला अधिकार इतिहास चिकित्सेचा? गुरूंनी सांगितला तोच आपला इतिहास, असा आपला इतिहास असताना कुणी नाहक चौकशी करू नये, आणि ज्यांनी केली त्यांचे काय झाले?" (उनि.६१) गुरुजी आणि आदिवासी तरुण यांच्या संवादातून तरुणाने इतिहासाची पुनर्मांडणी करण्याची आवश्यकता असल्याचे मत नोंदविले

आहे. वर्गात गुरुजी जो इतिहास शिकवतात तो बनावट, व्यक्तीकेंद्रीत असल्याचे या नायकाचे मत आहे. गुरुजींनी जो शिकवला तोच इतिहास कसा खरा मानायचा असा प्रति प्रश्न तो करतो. आदिवासी नायकाचे पूर्वज लढवय्ये होते. त्यांनी अनेक वेळा अन्यायी, जुलमी सत्तेच्या विरोधात लढा देऊन आपल्या आदिवासी बांधवांना न्याय मिळवून दिला होता; पण कर्तृत्वाची दखल इतिहासाने घेतली नाही. म्हणून तो गुरुजींना उद्देशून म्हणतो, "तुम्ही शिकविता तो इतिहास नव्हे, फार तर त्यास काय अक्षरांचा कल्पनाविलास म्हणता येईल, पांढऱ्या कागदावरील अन् तुमचे विद्यापीठही कसे हो ! सत्यापलापी इतिहासाचार्यांच्या पालख्या वाहण्यात धन्य समजतात स्वतःला" (उनि.६२) गुरुजींनी शिकविलेला इतिहास या नायकास मान्य नाही. म्हणून तो गुरुजींना उद्देशून म्हणतो, "गुरुजी ! आता तुम्ही तुमच्या इतिहासाच्या चोपड्या फेका मुळा- मुठेत, अथवा वीज गेल्यावर आंघोळीचे पाणी तापवा त्यावर. "आता आम्हीच आमचा इतिहास या डोंगराच्या पाटीवर अन् जगाला सांगू, बिरसाचे उलगुलान गुंडा धूरचा स्वातंत्र्य" (उनि.६२) प्रस्थापित उच्चवर्णीयांनी दिलेल्या इतिहासात आदिवासी नायकांना खलनायक ठरविण्यात आले. म्हणून हा तरुण आता आम्हीच लिहू आमचा इतिहास असा निर्धार व्यक्त करतो. शंबूक, एकलव्य, बिरसा मुंडा या आदिवासी तरुणांना न्याय देऊ शकणारा इतिहास लिहिण्याचा मनोदय हा तरुण करतो. तसेच आमच्या इतिहासात एकलव्याचा अंगठा छाटणारा गुरु द्रोणाचार्य शिर्काण करणारा राम, बळीराजाचे खुनी या कुणाचीच प्रतारणा ,विटंबना आमचा इतिहास करणार नसल्याची ग्वाही हा तरुण देतो.

**सारांश :-**

आज आदिवासींची एकसंघता गुदमरल्यासारखी झाली आहे. नाना धर्म-पंथांनी, संघ संप्रदायांनी, विचारप्रवाहांनी, जागतिकीकरणांनी, ग्लोबलायझेशेननी, यांत्रिकीकरणांनी, भ्रष्ट राजकारण्यांनी, भूलथापा देऊन आपल्या मायाजाळात गुंतवून ठेवण्याचा पायंडा घालविलेला आहे. प्रत्येक जण येतो आणि आपला वर्चस्वाद ठोकून जातो आहे. तो वर्चस्ववाद आदिवासींच्या मानसिकतेवर बिंबवून त्याला स्वतःची ओळख पटू द्यायची नाही आणि त्याला स्वतंत्र अस्तित्वाने स्वयंप्रेरणेने नांदू द्यायचे नाही. असा घाट घातला जात आहे. स्वतःच्या धार्मिकतेचा व वैचारिकतेचा रंग ओतून त्याला अंतर्बाह्य बरबाद करणाऱ्या धूर्त व कर्मकांडी प्रवृत्ती गिधाडाप्रमाणे त्याच्या सभोवती घिरट्या घालत आहेत. त्याचे धार्मिक, सांस्कृतिक ,सामाजिक मूल्य आणि संस्कार पायाखाली तुडवत आहेत. कोणत्या कळपात जावे कोणाचे ऐकावे व टाळावे या चक्रव्यूहात अडकला आहे. परका धर्म, परकीय संस्कृती, पूजा आणि परविचारानुसार कृती यामुळे आदिवासींचा ऱ्हासकाळ जवळ दिसू लागला आहे. आदिवासी

एकीकडे इथल्या भूमीची आधी संतान आहोत असे गर्वाने म्हणायचा आणि दुसरीकडे परदावणीला स्वीकारायचे. आपले अस्तित्व, अस्मिता, स्वाभिमान याबरोबरच सांस्कृतिक मूल्य जपण्याचा आव एकमताने ठरवून स्वतःला आधुनिकतेच्या जंजाळात मनाजोगे गुंगवून बेभान होऊन मस्तवाल व्हायचे. ही धरसोड वृत्ती आदिवासींच्या टोळी जीवनाला भगदाड पाडणारी आहे. अशा फसव्या सभोवतालच्या लचांडात अडकणार नाही. यासाठी सावध असायला हवे. भविष्यातील वेगाने होणाऱ्या वैज्ञानिक बदलाला सामोरे जाताना स्वतःबरोबर आपल्या मूल्य रक्षणाची जबाबदारी पेरण्यासाठी सज्ज असले पाहिजे. नव्हे, तर २१ व्या शतकात आदिवासी समाजातील माणसाचे अस्तित्व टिकवने अवघड होईल यासाठी वेळीच सावध झाले पाहिजे. साहित्य हे अन्यायाचा प्रतिकार करण्याचे दुःख, दैन्य मुक्तीचे व परिवर्तनाचे प्रभावी धारदार हत्यार आहे. म्हणून साहित्याने आदिवासी समाजाच्या हितासाठी, विकासासाठी आपली लेखणी झिजवण्याची आवश्यकता आहे. साहित्य हे एखाद्या जातीपातींच्या लोकांचेच मुक्तीशस्त्र नाही. जगात जे भ्रष्ट, अन्यायकारक विषम आहे. त्याला वाचा फोडून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सर्वधर्मसमभाव या संविधानात्मक मूल्यांची जोपासना करून रुजवण्याचे काम साहित्य करते. म्हणून साहित्य हे बळ देण्याचे कार्य करते. तसेच आदिवासींच्या दैन्य- दुःखांचे, दारिद्र्याचे चित्रण आदिवासी कवी आपल्या कवितांमधून करत आहेत. आदिवासी समाजाच्या शिक्षण, आरोग्य, पाणी, अन्न, निवारा या समस्या आदिवासी कवितांमधून कवी मांडत आहेत. म्हणून आदिवासी समाजाच्या वाट्याला आलेली उपेक्षा आणि अवहेलना याची परखडपणे नोंदही कवितांमधून घेतली जात आहे. ही कविता आदिवासींच्या वर्तमान वास्तवाचे चित्रण करून थांबत नाही. ती या शोकांतिकेचे मूळ ज्या इतिहासात आहे. त्याचे कठोर परीक्षण करीत आहे. हा कवींचा आत्मशोध असून आदिवासी संस्कृतीच्या मुळाचा शोध आहे. फक्त आदिवासी समाजाची वेदना, दुःख, दैन्य रेखाटून ही कविता थांबत नाही. तर या जुलमी व्यवस्थेविरुद्ध एका सर्वव्यापी संघर्षाचे निशाण हाती घेण्याचा पवित्रा ती घेते. आदिवासींचा धुमसणारा असंतोष लढण्याची ऊर्जा आहे. या बंडाला महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे बळ आहे. आदिवासी संस्कृतीची स्वायत्तता जपणे आणि तिची अस्मिता जागवणे हे या कवितेचे ब्रीद आहे. आजच्या मॉल, खाऊज्या संस्कृतीत निसर्गाशी असलेली सामाजिक बांधिलकी जपणारी आणि आदिम निरागसतेकडे जाणारी ही कविता समूहरूप धारण करते.

**संदर्भग्रंथ :-**

१) तुकाराम बी रोंगटे, 'आदिवासी कवितेचा उषःकाल आणि सद्यस्थिती' संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७

२) समन्वयक, कृष्णचंद्र ज्ञाते, 'आधुनिक मराठी पद्याचा पायाभूत अभ्यास' अभय प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, १९९७

३) संपा. मा. मा. जाधव, 'शब्दरत्न', निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, २०१३

४) र. बा. मंचरकर, 'सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०११

५) प्रकाश देशपांडे केजकर, 'समकालीन मराठी कविता : एक निरीक्षण', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०१३